# डॉ. खत्री महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा



**चंद्रपूर** : स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम चंद्रपूर येथे माजी विद्यार्थी संयोजन समितीच्या वतीने ८ मे रोजी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी प्राचार्य डॉ. एस. बी. मोहितकर, प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव डॉ. एस. बी. कपूर, संस्थेच्या कोषाध्यक्ष अनुश्री पराशर, इरफान शेख व सचिव प्रा. डॉ. प्रवीण चटप उपस्थित होते. यावेळी गुणवंत व विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या माजी विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी १३० माजी विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने उपस्थिती दर्शविली.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे म्हणाले की, मानवी जीवनात शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन आमच्या महाविद्यालयातील जे विद्यार्थी परीश्रम घेतले त्याची फलश्रुती माजी विद्यार्थी मेळाव्यात दिसत आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी माजी विद्यार्थ्यांचा आदर्श घेऊन परिश्रम करून स्वतःचे जीवन उन्नत करावे, असे ते म्हणाले.संस्थेचे सचिव डॉ. एस. बी. कपूर, संस्थेचे कोषाध्यक्ष अनुश्री पाराशर, माजी प्राचार्य डॉ. एस. बी. मोहितकर यांची समयोचित भाषणे झाली. माजी विद्यार्थी समितीचे अध्यक्ष प्रा. इरफान शेख आपल्या मनोगतात म्हणाले की, या महाविद्यालयात मी शिक्षण घेऊन आज आय.टी. क्षेत्रात नावलौकिक केले त्याचे श्रेय या महाविद्यालयातील मला शिकविणाऱ्या शिक्षकांना जाते. ही जाणीव मी कधीही विसरणार नाही, असे भावोद्गार त्यांनी यावेळी व्यक्त केले. माजी विद्यार्थी समितीचे सचिव प्रा. डॉ. प्रवीण चटप यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. रवी वाळके, प्रास्ताविक माजी विद्यार्थी संयोजन समितीचे प्रमुख प्रा. डॉ. पी. आर. मोहरकर यांनी केले. तर आभार प्रा. संतोष कावरे यांनी मानले. कार्यक्रमाकरिता डॉ. शरयू कटकमवार, प्रा. आर. के. राजूरकर यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील बहुसंख्य प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित
डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
माजी विद्यार्थी मेळावा
दिनांक: 08/05/2022 वेळ: सकाळी 9.30 वाजता


ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित


डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
माजी विद्यार्थी मेळावा
दिनांक: 08/05/2022 वेळ: सकाळी 9.30 वाजता
योजक:
र्थी समिती


माजी विद्यार्थी मेळावा